# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

## परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम ८(८) नुसार महाराष्ट्र शासनाने मे. एस.के. पटोडिया, मुंबई यांची अकृषी विद्यापीठाचे लेखापरीक्षण करण्यासाठी लेखापरीक्षकांचे पॅनलवर नेमणुक केली आहे त्याअनुषंगाने प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांनी दिनांक १०.०४.२०२४ रोजीच्या कार्यादेशानुसार मे. एस.के. पटोडिया, मुंबई या फर्मला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सन २०१८-१९ ते २०२२-२३ या पाच आर्थीक वर्षाचे लेखा परीक्षण करण्यासंदर्भात कार्यादेश दिले आहे.

त्यानुषंगाने मे. एस.के.पटोडिया, मुंबई हे दिनांक ०६.०६.२०२४ पासुन विद्यापीठात लेखा परीक्षणासाठी येणार आहेत. करीता मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशानुसार या परिपत्रकाद्वारे सर्व शेक्षणिक/प्रशासकीय विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, उपरोक्त लेखापरीक्षक ज्या वेळी आपल्या विभागातील संबंधीत दस्तऐवजाची मागणी करतील त्यावेळी सन २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीतील आपल्या विभागाशी संबंधीत दस्तऐवज (जसे की, ई-टेंडर, निवीदा, देयक, विविध कमिटीचे मिनिट्स इ.) लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे. लेखापरीक्षकास दस्ताऐवज उपलब्ध न करुन दिल्यास व त्यामुळे काही लेखा परिक्षण आक्षेप आल्यास त्यास संबधीत विभाग जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.

विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर. ][
संदर्भ क्रमांक वित्त व लेखा/अंकेक्षण/२०२४-२५/519-618 ][
दिनांक :- ०५.०६.२०२४ ][ (6)

वित्त व लेखाधिकारी

*****

**या परिपत्रकाची प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१) मा. कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, सदरील परिपत्रक मा. कुलगुरुंच्या अवलोकनार्थ सादर करण्यास्तव अग्रेषित.
२) मा. प्र-कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, सदरील परिपत्रक मा. प्र-कुलगुरुंच्या अवलोकनार्थ सादर करण्यास्तव अग्रेषित.
३) सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर/विद्यापीठ उपपरिसर धाराशिव.
४) संचालक, युनिक विभाग सदरील परिपत्रक संबधीत विभागास उपलब्ध करुन द्यावे.
५) अंतर्गत लेखा परिक्षक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर